महाराष्ट्र शासन

मृद व जलसंधारण विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, ७वा मजला, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

दूरध्वनी क्र .: २२८४६९७४

Email ID : jsa.wcd-mh@nic.in

दिनांक : १६ मे. २०२५

क्रमांक :जशिअ-२०२५/प्र.क्र.१२/जल-७

**प्रति,**

सर्व जिल्हाधिकारी तथा, अध्यक्ष, जिल्हास्तरीय समिती.

**विषय:-** **राज्यात गत वर्षांमध्ये विविध योजनेंतर्गत झालेल्या मृदसंधारण व जलसंधारण कामांची प्रत्यक्ष स्थळ पडताळणी ( Ground Truthing ) या कार्यक्रमाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी रोजगार हमी योजनेंतर्गत काम करणाऱ्या पी.टी.ओ., सि.डी.ओ., ग्रामरोजगार सेवक, ए.पी.ओ. यांना पथक प्रमुख म्हणून नेमणुक करणेबाबत.**

**संदर्भ:-** **१. शासन निर्णय समक्रमांक दि.१२/०३/२०२५**

**२. शासन निर्णय समक्रमांक दि.१३/०५/२०२५**

**महोदय,**

राज्यात गत वर्षांमध्ये विविध योजनेंतर्गत झालेल्या मृदसंधारण व जलसंधारण कामांची प्रत्यक्ष स्थळ पडताळणी ( Ground Truthing ) या कार्यक्रमाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी संदर्भ क्र. १ शासन निर्णयान्वये मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. सदर कार्यक्रम हा माहे मे-२०२५ अखेर पूर्ण करावयाचा असून कृषि पर्यवेक्षक व कृषि सहाय्यक संघटनांनी पथक प्रमूख म्हणून कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्यासाठी बहिष्कार टाकल्यामूळे सद्यस्थितीत प्रत्यक्ष स्थळ पडताळणीचा वेग मंदावला असल्याचे दिसुन येत आहे. त्यामुळे सदर कार्यक्रमाची अंमलबजावणी विहीत कालावधीमध्ये पूर्ण करणेकरिता रोजगार हमी योजनेंतर्गत येणारे पी.टी.ओ., सि.डी.ओ., ग्रामरोजगार सेवक, ए.पी.ओ. यांची पथक प्रमुख म्हणून नेमणूक करून कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी त्यांच्या सेवा घेण्यात याव्यात. स्थळ पडताळणीचे काम करण्यास ईच्छुक असणारे व याबाबतचे मोबाइल ॲप हाताळू शकणा-या रोजगार हमी योजनेंतर्गत काम करणा-या उपरोक्त कर्मचा-यांच्या नेमणुका पथक प्रमूख म्हणून करण्यात येऊन सदरचे काम जलद गतीने पूर्ण करण्यात यावे.

Scanned with OKEN Scanner

२.	कार्यक्रमांतर्गत पथक प्रमुख म्हणून रोजगार हमी योजनेंतर्गत येणाऱ्े पी.टी.ओ., सि.डी.ओ., ग्रामरोजगार सेवक, ए.पी.ओ. यांची नेमणूक केल्यानंतर सदर अधिकारी/ कर्मचारी यांचे महाराष्ट्र सुदूर संवेदन उपयोजन केंद्र, नागपूर (MRSAC) यांनी विकसीत केलेल्या मोबाइल ॲप वापरासाठी लॉगिन आयडी तयार करून घेऊन सदर नमूद सर्व अधिकारी/ कर्मचारी यांना मोबाइल ॲप वापरासाठी जिल्ह्यातील मास्टर्स ट्रेनर्सव्दारे प्रशिक्षण देण्यात यावे. तसेच, पथक प्रमुख म्हणून नेमणूक करण्यात येणा-या पी.टी.ओ., सि.डी.ओ., ग्रामरोजगार सेवक, ए.पी.ओ.यांनाही संदर्भ क्र. २ मधील शासन निर्णयातील तरतूदीनुसार मोबाइल इंटरनेटकरिता खर्च अदा करावा.

आपला,

( पंडित जाधव )
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत: माहितीस्तव व योग्य कार्यवाहीस्तव
१. जिल्हा जलसंधारण अधिकारी तथा सदस्य सचिव, जिल्हास्तरीय समिती:- आपणांस निदेशीत करण्यात येते की, उपरोक्त सूचनांनुसार आवश्यक कार्यवाही करावी.
२. उप सचिव, रोजगार हमी योजना: आपणांस विनंती करण्यात येते की, आपल्या स्तरावरून संबंधित अधिकारी/ कर्मचारी यांना सहकार्य करण्यासाठी सूचित करण्यात यावे.

Scanned with OKEN Scanner